**रे.दि.मु.नं.३२७/२०१२ मधील नि.४१ वरील आदेश**

सी.एन.आर.क्र.एम.एच.एस.टी.१६००१०९९०१२

(घोषित दि.२१/०१/२०२०)

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरूस्ती करण्यास परवानगी मिळावी यासाठी दाखल केलेला आहे.

२) थोडक्यात वादी यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी दशरथ भिकू येवले मयत झाल्यानंतर त्यांचे वारस दाव्यात सामील केलेले आहेत. तथापि, त्यावेळेस प्रतिवादी क्र.१ड हिचे नाव नजरचुकीने मोनिका महेश यादव असे लिहीलेले होते. प्रतिवादी क्र.१क हिचे लग्न दावा दुरूस्त करतेवेळेस झालेले नव्हते. तथापि तिचे लग्न झालेले असून तिचे नाव शामली सुशांत यादव असे झालेले आहे. त्याचप्रमाणे प्रतिवादी नं.१ड चे खरे नाव मोनिका उर्फ मोना सुधीर यादव असे आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी नं.१क आणि १ड यांच्या नावामध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केलेली आहे.

३) सदर दुरूस्ती अर्जावर प्रतिवादी यांनी म्हणणे देवून अर्जातील मजकूर व मागणी अमान्य केलेली आहे. केवळ दाव्याचे कामकाज लांबविण्याच्या हेतूने दिलेला अर्ज नामंजूर करण्यात यावा असे त्यांचे म्हणणे आहे. यदाकदाचित अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे असे न्यायालयाचे मत झाले तर वादीवर रू.५०००/— खर्च लादण्यात यावा असे प्रतिवादींचे म्हणणे आहे.

४) अर्जातील कथनांचा विचार केला असता केवळ प्रतिवादी क्र. १क आणि १ड यांच्या नावामध्ये चूक झालेली आहे. ती दुरूस्त करण्यात यावी असे वादींचे म्हणणे आहे. वास्तविक पाहता प्रतिवादी क्र. १अ हिने न्यायालयात हजर होवून प्रतिवादी क्र.१ब, १क आणि १ड यांनी

तिला मुखत्यारपत्र करून दिलेले आहे याबाबत सदरचे मुखत्यारपत्र दाखल केलेले आहे.  अशा परिस्थितीत पक्षकारांचे नाव दुरूस्त करणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक झालेले आहे.  सदर दुरूस्तीमुळे दाव्याच्या स्वरूपात कोणताही बदल होत नाही.  अशा परिस्थितीत मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे—

**<u>आदेश</u>**

१) नि.४१ वरील अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२) वादींनी अर्जातील विनंतीप्रमाणे दाव्यामध्ये नियोजित दुरुस्ती ही आजपासून १४ दिवसांच्या आत करावी आणि दुरुस्त दाव्याची प्रत दाखल करावी.

३) सदर अर्जाचा खर्च हा अंतिम हुकुमनाम्यानुसार राहिल.

Dipak Raghunath Mali
Digitally signed by Dipak Raghunath Mali
Date: 2020.01.21 17:19:27 +0530

( डी. आर. माळी. )

दि.२१/०१/२०२० दुसरे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
वाई.